# कल्याण डोंबिवली महानगरपालिका
सामान्य प्रशासन मुख्यालय
शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम) ०२५१–२२०३६२१


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक : ३०/८/२०२२

## जा हि रा त

कल्याण डोंबिवली महानगरपालिका अंतर्गत सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा एमपॅनलमेंट पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेकामी खालील नमूद केल्याप्रमाणे शासकिय /निमशासकिय कार्यालय / कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडील, तसेच नगरपरिषद /नगरपालिका /महानगरपालिका /शासकिय /निमशासकिय / सिडको /म्हाडा इत्यादी कार्यालयामध्ये किमान १० वर्षे काम केल्याचा अनुभव आणि उत्तम प्रकृती असलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून, एमपॅनलमेंट (Empanelment) करून घेण्यासाठी कनिष्ठ अभियंता या पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छूक व पात्र सेवानिवृत्त अभियंता (स्थापत्य), सेवानिवृत्त अभियंता (यांत्रिकी), सेवानिवृत्त अभियंता (विद्युत) यांनी **दि.०२/९/२०२२ ते १६/९/२०२२** रोजी **सायंकाळी ५.००** वाजेपर्यंत अर्ज सादर करावयाचे आहेत.

| अ क्र | पदनाम | पद–संख्या | विवक्षित कामे | शैक्षणिक अर्हता | अनुभव | देय मासिक पारिश्रमिक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेवानिवृत्त अभियंता (स्थापत्य) | १३ | सार्वजनिक बांधकाम विभाग/प्रभाग समिती कार्यालय/नगररचना विभाग/ पाणी पुरवठा विभाग/विद्युत विभाग/ यांत्रिकी विभाग, तसेच मालमत्ता विभागातील विवक्षित कामे / महानगरपालिकेच्या तांत्रिक विभागा–मार्फत सोपविण्यात येणारे सर्व प्रकारचे कामकाज | मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी | शासकिय/ निमशासकीय/ सिडको/म्हाडा/ नगरपरिषद/ नगरपालिका/ महानगरपालिका मध्ये किमान १० वर्षाचा काम केल्याचा अनुभव | सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/ १३ दि.१७/१२/१६ मधील ड(१)(क) च्या अनुषंगाने देय राहील. |
| २ | सेवानिवृत्त अभियंता (यांत्रिकी) | | | | | |
| ३ | सेवानिवृत्त अभियंता (विद्युत) | | | | | |

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण** – सामान्य प्रशासन विभाग, दुसरा मजला, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, शिवाजी चौक, कल्याण (प.)–४२१ ३०१ येथे अर्ज स्वीकारले जातील.

**अर्ज स्विकारण्याचा कालावधी** – दिनांक ०२/९/२०२२ ते १६/९/२०२२.
सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत

सदरहू भरती प्रक्रिये संदर्भात अधिक माहिती **www.kdmc.gov.in** या कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर आणि नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.

**अटी व शर्ती** :–

१) अर्जाचा नमूना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर नमुन्यातील अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, जन्मदिनांक, सेवानिवृत्तीचे प्रमाणपत्र, अंतिम वेतन प्रमाणपत्र, ना विभागीय चौकशी प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

२) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामूळे संबधितांस महापालिकेच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/ सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

३) नियुक्तीसाठी सक्षम असलेल्या प्राधिकरणाने विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा कर्मचाऱ्याच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.

४) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील. तसेच महानगरपालिकेत ठेकेदार, सल्लागार म्हणून कार्यरत असलेल्या व्यक्तींशी त्यांचे कोणतेही हितसंबंध नसल्याचे त्यांनी जाहिर करणे आवश्यक आहे.

६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस प्राप्त होणाऱ्या अधिकारांतर्गत येणारे आवश्यक दस्तऐवज/कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्री याबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने त्यांच्यावर सोपविलेले कामकाज, निश्चित केलेल्या विहित कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

८) सदरची सेवा फक्त ३ वर्षाच्या मर्यादेकरिताच राहणार आहे. तथापी प्रथम १ वर्षाच्या कालावधीत त्यांचे कामाचे मूल्यमापन करून पुढे सदरची सेवा सुरू ठेवणे किंवा नाही, याबाबत महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.

९) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

१०) सदरच्या मुलाखतीवेळी सादर करण्यात येणाऱ्या कागदपत्रांसोबत स्व–घोषणापत्र भरून देणे बंधनकारक राहील.

११) करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टिने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

१२) आवश्यकतेप्रमाणे सदर जाहिरातीमधील पदसंख्येत बदल करुन आवश्यक अभियंता घेण्याचा अधिकार आयुक्त, क.डों.म.पा., कल्याण यांना राहील.

१३) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

( डॉ.भाऊसाहेब दांगडे ) भा.प्र.से.
आयुक्त,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**सेवानिवृत्त अभियंता (..............) पदासाठी अर्ज**

पासपोर्ट आकाराचा फोटो चिटकवून स्वत: साक्षांकित करावा

प्रति,
मा.उप आयुक्त (सा.प्र.)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण

१) संपूर्ण नाव :— ..............................................................................................

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :— ...................................................................................
..........................................................................................................................
..........................................................................................................................

३) भ्रमणध्वनी क्रमांक व ई—मेल :— ..........................................................................
..........................................................................................................................

४) जन्मदिनांक :— ........./...../.............. अर्ज सादर करण्याच्या दिनांकास वय :—.............

५) सेवानिवृत्तीचा दिनांक :— ........./......./.................

६) सेवा निवृत्त झाले तेव्हाचे पदनाम :— ...........................................................................

७) सेवा निवृत्त झाले तेव्हाचे कार्यालय :— .......................................................................

**(सेवानिवृत्तीसंदर्भातील आदेश/पत्राची छायांकीत प्रत सोबत जोडावी)**

८) शैक्षणिक अर्हता :— ........................................................................................

९) कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित आहे किंवा कसे? तसेच अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झाली असल्यास त्याबाबतचा तपशिल :— ..............................................
..........................................................................................................................

१०) शैक्षणिक अर्हता :— ........................................................................................

११) अर्जासोबत खालील (छायांकीत प्रती) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१)...................................................... २)......................................................
३)...................................................... ४)......................................................
५)...................................................... ६)......................................................

वर नमूद केलेली सर्व माहिती खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रदद करण्यात येईल आणि माझे विरूध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण : सही :—

दिनांक : ...../..../२०२२ (नाव : .................................................. )

---

**—: कार्यालयाने करावयाची कार्यवाही :—**

उपरोक्तप्रमाणे उमेदवाराची माहिती व सोबतची कागदपत्रे तपासली असून सदर पदासाठी............(पात्र/अपात्र) आहे.

पात्र/अपात्र कारण : .....................................................................................................

दिनांक : ....../..../२०२२ तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी :

( नाव व पदनाम : .................................... )